प्रकरण चौथे

# ‘हिंदू’ कादंबरीचे स्वरुप

४.१) प्रास्ताविक

४.२) कथानक

४.३) कथानकाचा आशय

४.४) व्यक्तिरेखा

४.५) ‘हिंदू’ कादंबरीतील संघर्ष

४.६) छोट्या - छोट्या वाक्यांचा वापर

४.७) रूपक, प्रतिकांचा वापर

४.८) समारोप

४.९) निष्कर्ष

प्रकरण चौथे

# 'हिंदू' कादंबरीचे स्वरुप

**प्रास्ताविक :**

शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या' कादंबरीचा पुढील भाग म्हणून 'हिंदू' ही कादंबरी ओळखली जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला 'हिंदू' कादंबरीचा वाङ्मयीन अभ्यास करावयाचा आहे. त्यांच्या 'उपल्या' कादंबरीमधून जशी मानवामध्येही उपल्याची वृत्ती दिसून येते त्याचप्रमाणे 'हिंदू' या कादंबरीमधून एकीकडे उग्र हिंदुत्वाची लाट आणि दुसरीकडे त्याविरुद्ध संघटित होणारी दलितांमधील आत्मसन्मानाची जाणीव दिसून येते.

दलितेतरांकडून होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध दलितांनी संघर्ष करून स्वत:ला न्याय मिळवून घेण्यासाठी व जाचक समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळीद्वारे दलित बांधवांना प्रेरित केले. पण बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत फूट पडली. दलितांमध्ये दुफळी निर्माण झाल्याने चळवळीच्या आश्रयाने चंगळवाद वाढू लागला. त्यामुळे चळवळीचे भांडवल करून जगणाऱ्या काही भ्रष्ट प्रवृत्ती समाजात वावरू लागल्या. याचाच फायदा सवर्ण समाजाने घेतला. हिंदू समाजातील विषम ताणेबाणे आणि विकृत जातीव्यवस्था शिगेला पोहचली. याचे चित्रण 'हिंदू' कादंबरीतून दिसून येते.

*** 'हिंदू' कादंबरीचे कथानक :**

इंदापूर तालुक्यातील धरणगाव येथून पाच किलोमीटर अंतरावर निसर्गाची देणगी लाभलेले अचलपूर हे गाव. जेमतेम तीन हजार लोकसंख्या असलेलं अचलपूर हे डोंगराच्या कुशीतलं खेडं गावाच्या पूर्वेला फाशीचा डोंगर आणि या डोंगरातच इंग्रजांनी अनेक भारतीयांना फासावर लटकावले होते. अनेक राजकीय पुढाऱ्यांनी इथे जागा खरेदी करून ठेवल्या होत्या. प्राथमिक शाळा आणि पोष्ट ऑफिस ह्या दोनच सुधारणा गावात होत्या. गाव

तसं जुनं पुराणचं, पण या गावच्या दोन ठळक खूणा होत्या. एक फाशीचा डोंगर आणि दुसरी खूण म्हणजे कावळेचा वाडा.

अचलपूरची अलीकडची ओळख म्हणजे तात्या कांबळेचा जलसा. 'जलसाकार' तात्या कांबळेचा गाव म्हणून ह्या गावची ओळख वाढत होती.[१] त्यामुळे अनेकांच्या कपाळावर आठ्या पडत होत्या. एका महाराच्या नावाने गावाची ओळख व्हावी हे गाववाल्यांना बोचत होते, याचेच रुपांतर तात्या कांबळेच्या हत्येत होते. हल्लेखोरांनी तात्या कांबळेला ठार करुन 'जलसाकार तात्या कांबळेचं गाव' ही ओळख कायमची पुसून टाकली होती. नाव असलेल्या आणि म्होरक्या असलेल्या दलिताचा खून करून सर्वसामान्य दलितांना धडा शिकवण्याचा हा प्रयत्न होता. या घटनेमधून सामाजिक दहशतवादाचे विकृत रूप दिसून येते. सवर्ण आणि दलित समाजातील संघर्षाचे दाहक चित्रण या कादंबरीतून दिसून येते. तात्या कांबळेचं घराणं मुळचं तमासगिराचं. त्यांच्या घरात गाणं पिढीजाद असल्याने जणू तमाशा हाच ह्या घराण्याचा वंशवृक्ष होता. त्यामुळेच तमासगिराचं घराणे म्हणून त्यांची ख्याती होती. या घराण्यामुळेच अचलपुरात गाणे आणि घुंगरु कायमचं वस्तीला आले होते.

तात्या कांबळेचे आजोबा पिराजीराव कांबळे हे प्रसिद्ध तमासगीर होते. शिवाय ते एकटेच स्त्री व पुरुषाच्या आवाजात गायचे. 'सत्यवान सावित्री', 'दामाजीपंत', आणि 'राजा हरिश्चंद्र तारामती' अशा खेळांनी त्यांचा नावलौकिक झाला होता. तात्या कांबळेचे वडील उमाजीराव नाईक हे तर तमाशावेडेच असल्याने त्यांनी घरादाराकडे दुर्लक्ष करून तमाशालाच वाहून घेतले होते. बैलगाडीच्या जागी त्यांनी जुनी मोटारगाडी, लाईट, कनात,साऊंडसारख्या आधुनिक व्यवस्थेसह टोलेजंग फड उभा केला होता. तमाशा लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी तमाशात नाच्याऐवजी नाचीला आणले. पण तात्या कांबळेनी हा वसा नव्या रूपात चालवला. तमाशा करुन छंदीफंदी लोकांची करमणूक करण्यापेक्षा अज्ञानाच्या अंधकारात सापडणाऱ्या आपल्या समाजबांधवांना जागृत करण्याचे काम त्यांनी हाती घेतले.

तमाशाऐवजी त्यांनी 'आंबेडकरी जलसा' सुरु केला. गावोगावी जाऊन त्यांनी दलित वस्त्यांमध्ये प्रयोग करून दलित बांधवांना स्वत:वर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची तसेच सवर्ण लोक स्वत:च्या स्वार्थासाठी दलित समाजाकडून घाणेरडी कामे करुन घेतात याची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न आंबेडकरी जलशाद्वारे केला. अधूनमधून समाजमंदिरापुढे या जलशाच्या रंगीत तालमी व्हायच्या, आणि गावाला रंगमंचाचं रुप यायचे या जलशासाठी तात्या कांबळेनं आपल्या समाजातील नवीन दमाचे तरुण पुढे आणून त्यांना गाणे बजावणे शिकवले. तात्या कांबळे सूत्रधाराची भूमिका करायचा. कबीर कांबळे गाण रचायचा व संवाद लिहायचा. मंगेश कांबळे ढोलकी वाजवायचा काशिनाथ पोळके हार्मोनियम वाजवायचा, धीरज पगारे नायकाच पात्र वटवायचा. संदीप पोळके खलनायकाची भूमिका समर्थपणे वटवायचा. रोहित व सदानंद कांबळेही अधूनमधून सहकलाकाराची भूमिका करायचे पण गेल्या दोन वर्षापासून तात्या कांबळेची सूत्रधाराबरोबरच जलशातील मग्रूर पाटलाची भूमिका लोकांच्या पसंतीला अधिक उतरल्याने लोक त्यांना 'पाटील' म्हणूनच ओळखत असत. तात्या कांबळेच्या जलशामुळे गावातले वातावरण ढवळल्याने मधुकर कावळे, गुणवंत पाटील, नागनाथ बलशेटवार, विष्णू पुजारी, रवी मोरे इ. सवर्ण लोकांचे तात्या कांबळेचा जलसा बंद पाडला पाहिजे यावर एकमत झाले. किड्या मुंग्यासारखं क्षुद्रं जीवन जगणारी माणसं फुत्कारत होती. त्यामुळे सवर्णाचा अहंकार दुखावत होता. दलितांच्या स्वाभिमानाने सवर्णामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. धम्मचक्र परिवर्तनाच्या कार्यक्रमात तात्या कांबळे पहाडी आवाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडत होता. भाषण संपले आणि सुरेश चव्हाणने तात्या कांबळेला चिट्ठी पाठवून व्यासपीठावरून खाली बोलावून घेतले. तात्या कांबळे बरोबर सुरेश चव्हाण, रवी मोरे, शंकर पुजारी गावातल्या चौकात आले तोच तालमीत लपून बसलेले प्रभाकर कावळे, गुणवंत पाटील, जगन्नाथ पंडित, दिपक माने हे हातात शस्त्रे घेऊन धावत बाहेर आले, आणि तात्या कांबळेवर तूटुन पडले. क्षणातच तात्या कांबळे रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. सोनाली वाड्याच्या गच्चीवरुन हे दृश्य पाहून घाबरल्याने तिला आभाळ फाटल्यासारखं व धरणी

दुभंगल्यासारखी वाटली. आपला नवराही या खूनात सहभागी असावा. या गोष्टीवर तिचा विश्वास बसत नाही. प्रभाकर कावळे हिंस्त्र श्वापदासारखा तात्या कांबळेवर तुटून पडताना तिने पाहिले असल्याने स्वत:च्या भांगात तात्या कांबळेच रक्त भळभळत असल्याचा भास तिला झाल्यासारखा वाटत होता. हा खून होताना माणिकचंद व गोपीचंदन पाहिले होते. याचा फायदा ते दोघे घ्यायचं ठरवतात. खूनामुळे महारवाड्यातील सभा उधळल्याने लोक सैरावैरा धावत होते. आपल्या वडिलांचा खून झाला व हा खून प्रभाकर कावळे याने केला हे समजताच रोहित हातात तळपती कुऱ्हाड घेऊन रामभाऊ कावळेच्या वाड्यात आला. सोनालीने दार उघडताच तिला समोर पाहून तो थबकला त्याच्या हातातील कुऱ्हाड आपोआप खाली गळून पडली. सोनालीने त्याला गुन्हा करण्यापासून परावृत्त केले होते. सोनाली ही प्रभाकरची बायको आहे ही गोष्ट त्याला त्याचवेळी समजली होती. 'रोहित ऽ ती कुऱ्हाड इकड आण. कायदा हातात घेऊ नकोस. मी काय म्हणतेय ते लक्षात येतयं का ? तुझ्या वडिलांच्या खून्यांना जरुर शिक्षा मिळेल. त्यासाठी तू बरबाद होऊ नकोस, निदान माझ्यासाठी तरी''[२] सोनालीच्या या वाक्यांनी रोहितच्या डोळ्यात अश्रू दाटले. तो शांतपणे निघून गेला कारण सोनाली व रोहित एका कॉलेजमध्ये शहरात शिकत असतानाच त्यांनी कॉलेजमध्ये कार्यक्रमात भाग घेतला होता.

सोनालीचा रोहितवरील प्रभाव पाहून रामभाऊ कावळे चकित झाला. थोड्याच वेळात रक्ताने माखलेल्या कपड्यानिशी प्रभाकर घरात प्रवेश करताच माणिकचंद व गोपीचंदने त्याला खून करताना पाहिल्याचे रामभाऊ सांगतात. आताच्या आता मोठा मुलगा मधुकरकडे पुण्याला जाण्यास सांगतात. कुणाचाही निरोप न घेता प्रभाकर माणिकचंद व गोपीचंदच्या फार्महाऊसवर जातो. तात्या कांबळेचा लहान भाऊ सदानंद कांबळे हा त्यांच्या फार्म हाऊसवर वॉचमन असल्याने त्याची बाजू माणिकचंद व गोपीचंद घेतील. आपल्याला शिक्षा होईल या काळजीने प्रभाकर 'भाऊ तुम्ही आम्हाला सांभाळून घ्या'[३] अशी विनवणी करतो. फार्महाऊसवर माणिकचंद व गोपीचंद बरोबर मिलिंदही एनजॉय करायला गेला होता. त्यानेही तात्या कांबळेचा खून होताना पाहिले होते. आपल्यासमोर त्यांचा खूनी उभा

आहे हे समजल्यावर आपला वर्गमित्र रोहिदास नागदिवे हा माजी मंत्री आहे असे सांगितल्यावर प्रभाकरने रोहिदासवर प्राणघातक हल्ला केला. शिवाय मिलिंद हा दलितांचा पुढारी असल्याने आपण निर्दोष सुटणार नाही अशी त्याला खात्री होती. मिलिंदचा मित्र माजी मंत्री आहे हा एकच धागा पकडून माणिकचंद व गोपीचंद प्रभाकरच्या भावाशी संपर्क साधून प्रभाकरला निर्दोष सोडविण्यासाठी पैशाची मागणी करतात. त्याबरोबर तात्या कांबळेचा भाऊ सदानंद हा खूनखटल्यातील महत्वाचा साक्षीदार असल्याने त्याच्या साक्षीवरच खटल्याचा निकाल अवलंबून असल्याचे माणिकचंद व गोपीचंद मधुकर कावळेला समजावून सांगतात त्यासाठी सदानंदला सरपंचपद देण्याविषयी मधुकर कावळेशी चर्चा करतात. कारण त्याच्याद्वारेच ते दोघे राजकारणात उतरण्याचा प्रयत्न करतात. सदानंदने सरपंचपदी मजल मारली होती याचा फायदा माणिकचंद व गोपीचंद घेत होते. प्रभाकर निर्दोष सुटण्यासाठी मधुकर कावळेकडून वेळोवेळी पैसेही घेत होते. त्याचबरोबर दलित समाजाच्या बाजूनेही इतर कार्यकर्त्यांच्याबरोबर खून खटल्याचा निकाल लावण्यासाठी प्रा. राहूल बनसोडे, रमा बाबर यांच्याशी मधुकरच्या नकळत चर्चा करून दोन्ही बाजूंनी आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत होते.

तात्या कांबळेच्या खूनानंतर धरणगावात सवर्णांनी दलितांची घरे जाळल्याने दलितांना नवीन घरे बांधून मिळाली होती. पालक मंत्री ना. माने व माजी मंत्री रोहिदास नागदिवे यांच्या हस्ते समारंभपूर्वक दलितांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. नवीन घरात प्रवेश करताना दलितांचे चेहरे उजळले होते. रोहित व त्याची आई सविता यांच्या चेहऱ्यावर मात्र उदासी होती. दलितांना नवी घरं मिळाली असली तरी जगण्यासाठी गावावरच अवलंबून राहणं भाग होते. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला नव्हता. त्यामुळे त्यांना गावाची मनधरणी करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यासाठी प्रत्येकाने आपआपली जुनी कामे करण्यास सुरुवात केली होती. मात्र सदानंद कांबळेनं सरपंचपदापासून मंत्रीपदापर्यंत मजल मारली होती. त्यासाठी त्याला आपल्या भावाचा झालेला खून पचवावा लागला होता. मारेकऱ्यांच्या बाजूने साक्ष द्यावी लागली. त्याने आपला जबाब कोर्टात उलटवल्याने

त्याच्याविरुद्ध सर्व दलित समाज पेटून उठला होता. इकडे प्रभाकर तुरुंगात असताना सोनाली रोहितसाठी वेडीपिशी झाली होती.

स्वत:च्या स्वार्थासाठी कोर्टात सदानंद मारेकऱ्यांच्या बाजूने साक्ष देतो व गुन्हेगार निर्दोष सुटतात. हे ऐकून काशिनाथ पोळके स्वत:ला पेटवून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलवले जाते. गावात कावळेच्या वाड्यात धामधूम चालते आणि निर्दोष सुटलेले मारेकरी मिरवणूकीने कावळेच्या वाड्यावर येतात. मिरवणूक वाड्याजवळ येताच सोनाली प्रभाकरला ओवाळत असतानाच कबीर कांबळे आपल्याजवळील बंदुकीने गोळ्या झाडतो अन क्षणार्धात प्रभाकरचा देह जमिनीवर कोसळतो. गर्दीनं झालेल्या चेंगराचेंगरीत विष्णु पुजारी मरण पावतो. काहीजण किरकोळ जखमी होतात. कबीर कांबळे पोलिसांच्या स्वाधीन होतो. प्रभाकरचा देह गाडीत टाकून शासकीय रुग्णालयात नेला जातो. काशिनाथ पोळकेला त्याच दवाखान्यात ॲडमिट केल्याने अगोदरच दलित कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते. मधुकर कावळेच्या गाडीकडे सिद्धार्थ पगारेच लक्ष जाताच तो गाडीकडे सर्वांचं लक्ष वेधतो. सर्व गटतट विसरुन दलित कार्यकर्ते मधुकर कावळेच्या मदतीला धावतात तेव्हा कावळेही गदगदुन जातो.

**'हिंदू कादंबरीचे आशयसूत्र' :**

शरणकुमार लिंबाळे यांची 'हिंदू' ही कादंबरी दलित साहित्यात एक नवी आशा पल्लवीत करते, कारण या कादंबरीचा विषय हा सवर्ण व दलितांमधील आत्मसन्मानाची जाणीव विशद करणारा आहे. या कादंबरीमधून ग्रामीण भागातील पुढारी, प्रस्थापित सवर्ण लोक गावात आपले वर्चस्व कायम रहावे म्हणून दलित समाजाबरोबर सतत संघर्ष करत असताना दिसतात. या ग्रामीण राजकीय जीवनाचे आणि तद्नुषंगाने समाजजीवनाचे, भावजीवनाचे, चित्रण कांबरीकाराने वास्तववादीपणे केले आहे. या कादंबरीचे कथानक तात्या कांबळे, सदानंद कांबळे, माणिकचंद व गोपीचंद, रोहीत, प्रभाकर कावळे, मधुकर कावळे, सोनाली, कबीर कांबळे इ. पात्राभोवती फिरते. कादंबरीच्या मनोगतामध्येच

कादंबरीकाराने सांगितले आहे की, 'दलितांवर होणारा अन्याय, अत्याचार हा अनेक पदरी असतो. त्यामागे अनेक शक्ती कार्यरत असतात. हिंदू समाजातील विषम ताणेबाणे आणि विकृत जातीव्यवस्थेचे चित्रण या कादंबरीतून होते. कादंबरीचे कथानक इंदापूर तालुक्यातील धरणगाव येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे अचलपूर या गावातील जातीयवादाचे संघर्षचित्र लेखकाने अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

तात्या कांबळेच्या घरात गाणे पिढीजाद असल्याने जणू तमाशा हाच ह्या घराण्याचा वंशवृक्ष होता. पण तात्या कांबळेने हा वसा नव्या रुपात पुढे चालवून तमाशाच्या रुपाने छंदीफंदी लोकांची करमणूक करण्यापेक्षा अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या समाजबांधवांना जागृत करण्याचे काम हाती घेतले. तमाशाऐवजी त्यांनी 'आंबेडकरी जलसा' सुरू करून या जलशामधून सवर्णांकडून दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध दाद मागण्यासाठी आपल्या बांधवांना प्रेरित केले. स्वार्थासाठी सवर्ण आपला उपयोग करून घेतात याची कल्पना त्यांनी जलशातील स्वत:च्या मग्रूर पाटलाच्या भूमिकेतून व्यक्त केलेली दिसते. येथे लेखक समाजाकडे डोळसपणे बघतो. जलशामुळेच अचलपूर हे गाव ओळखले जाते. जलसाकार तात्या कांबळेचं गाव अशी ह्या गावची ओळख होती. जलशाचे कार्यक्रम अधूनमधून समाजमंदिरात होत असल्याने गावातलं वातावरण ढवळले होते. एका महाराच्या नावानं गाव ओळखलं जावं हे गाववाल्यांना बोचत असल्यामुळे तात्या कांबळेचा काटा काढायचा. यावर सर्व गाववाल्यांचे एकमत होते. धम्मचक्र परिवर्तन दिनादिवशी तात्या कांबळेला व्यासपीठावरून खाली बोलावून सवर्ण लोक गावातील चौकात खून करून 'जलसाकार तात्या कांबळेचं गावं' ही ओळख कायमची पुसून टाकतात. नाव असलेल्या आणि म्होरक्या असलेल्या दलिताचा खून करुन सर्वसामान्य दलितांना धडा शिकवण्याचा हा प्रयत्न होता. या घटनेतून सामाजिक दहशतवादाचे विकृत रुप दिसून येते. यातून काही मानवी प्रवृत्तीचे दर्शनही लेखक घडवतो. प्रा. राहूल बनसोडेसारखा दलित प्राध्यापक तात्या कांबळेच्या प्रेताचे भांडवल करून स्वत:ला प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. एकीकडे तात्या कांबळेच्या खून्याला

निर्दोष सोडविण्यासाठी मधुकर कावळेकडून पैसे घेणाऱ्या तर दुसरीकडे दलित कार्यकर्त्यांव्दारे दलित सवर्णामध्ये संघर्ष, चळवळ घडवून आणून राजकारणामध्ये प्रवेश करून लोकांच्या प्रश्नाकडे स्वत:ची तुंबडी भरुन घेण्याच साधन म्हणून पाहणाऱ्या माणिकचंद व गोपीचंद यासारख्या लाचखाऊ व्यक्तीद्वारे वर्तमानकालीन सत्य लेखक आपल्यापुढे मांडतो.

भावाचा खून करणाऱ्याच्या बाजूने साक्ष देणारा, राजकीय स्वार्थासाठी सत्याकडे पाठ फिरवणारा, हरघडी तडजोड करणारा, दुसऱ्यांच्या मताने वागणारा, सरपंच पदापासून मंत्रीपदापर्यंत मजल मारणारा सदानंद कांबळे म्हणजे लाचारीचं मूर्तीमंत प्रतीक आणि दलित गुलामगिरीच्या इतिहासाची एक आगळीवेगळी साक्षच दिसून येते. दलित सवर्णांमध्ये चाललेली गटबाजी भयानक आहे. सत्य इथून केव्हाच पळाले आहे. अशातही प्रामाणिकपणे काम करणाऱ्या तात्या कांबळेसारख्या निस्वार्थी कार्यकर्त्याचा खून करून प्रभाकर कावळे तुरुंगात जातो. नवविवाहित सोनालीचे जीवन उध्वस्त होते. तात्या कांबळेच्या खूनाचा बदला घेण्यासाठी कबीर कांबळे प्रभाकरचा खून करुन पोलिसात हजर होतो तर माणिकचंद व गोपीचंद यासारख्या स्वार्थी व्यक्ती मात्र समाजात उजळमाथ्याने वावरतात. लेखक शरणकुमार लिंबाळे या कादंबरीमधून हिंदू धर्मावरील जातियतेचा कलंक किती काळाकुट्ट आहे हे विशद करतात.

**व्यक्तिचित्रण :**

*** तात्या कांबळे :**

तात्या कांबळे हा अचलपूरचा दलित पुढारी व जलसाकार असल्याने 'जलसाकार' तात्या कांबळेचं गाव म्हणून अचलपूरची ओळख वाढत होती. तात्या कांबळेच्या घरात गाणे पिढीजाद असल्याने तमाशा हाच त्यांच्या घराण्याचा वंशवृक्ष असल्याने तमासगीराच घराणे म्हणून त्यांची ख्यात होती. त्यांच्यामुळेच अचलपूरात गाणे आणि घुंगरु कायमचं वस्तीला आले होते. तात्या कांबळेचे आजोबा प्रसिद्ध तमासगीर असल्याने 'सत्यवान सावित्री'

'दामाजीपंत' आणि 'राजा हरिश्चंद्र तारामती' अशा खेळात त्यांचा नावलौकिक होता. त्यांचे वडीलही तमाशावेडे असल्याने घरादाराकडे दुर्लक्ष करून पूर्णपणे तमाशालाच वाहून घेतले होते. तमाशा लोकप्रिय करण्यासाठी बैलगाडीच्या जागी जुनी मोटार विकत घेतली. तंबू, कनात, लाकडी स्टेज, लाईट, साऊंडव्यवस्था यासारख्या आधुनिक व्यवस्थेबरोबरच तमाशात नाच्याऐवजी नाचीला आणले. तमासगीराचे घराणे असल्याने ते गावातल्या कार्यक्रमात तसेच वरातीपुढे नाचत होते. त्याबदल्यात त्यांना बिदागी मिळत होती.

तात्या कांबळेन हा वसा नव्या रुपात चालवला. गावातील वरातीपुढ नाचणे सोडून दिले. स्वत: बौद्ध धर्म स्वीकारुन गावकीही नाकारली. तमाशा करुन छंदीफंदी लोकांची करमणूक करण्यापेक्षा अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या समाजबांधवांना जागृत करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. तमाशा ऐवजी त्यांनी 'आंबेडकरी जलशाचे' गावोगावी जाऊन दलित वस्त्यामध्ये प्रयोग करुन दलित बांधवांना स्वत:वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला. तात्या कांबळे सूत्रधाराबरोबरच मग्रूर पाटलाची भूमिका करायचा. त्याची ही भूमिका लोकांच्या पसंतीला उतरल्याने लोक त्यांना 'पाटील' म्हणूनच ओळखत असत. जलशामुळे गावातले वातावरण ढवळल्याने शिवभजन ऐकायला येणारी मंडळी जलशा पहायला जात होती. राखीव जागेमुळे तात्या कांबळे गावचा पाटील होईल म्हणून मधुकर कावळे चिडला होता, नोकरी घालवली म्हणून जगन्नाथ पंडित सूडाने पेटला होता. सरपंचपद हुकलं म्हणून गुणवंत पाटील चिडला होता. जलशामुळे लोकांचा देवधर्मावरील विश्वास उडाला तर मंदिराचे उत्पन्न बुडेल म्हणून विष्णु पुजारी अस्वस्थ झाला होता. सर्वांच्या मनात राग निर्माण झाल्याने हे सर्व लोक संगनमत करून तात्या कांबळेचा काटा काढण्याचे ठरवतात.

'किड्यामुंग्यासारखं' क्षुद्र जीवन जगणारी माणसे फुत्कारत असल्यामुळे सवर्णांचा अहंकार दुखावला होता. दलितांच्या स्वाभिमानाने सवर्णामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. 'त्यांनी आमची सेवा चाकरी करावी, आम्ही देईल ते घेऊन धन्य मानावं'[४] अशी

सवर्णांची भूमिका होती. पण दलितांनी ह्या व्यवस्थेला नाकारलं होतं. हे सर्व तात्या कांबळेच्या जलशामुळे घडत असावे असा संताप व्यक्त करुन त्यांचा खून करण्याचा बेत आखला जातो धम्मचक्रपरिवर्तनाच्या कार्यक्रमातील तात्या कांबळेच भाषण संपताच सुरेश चव्हाणने चिठ्ठी पाठवून तात्या कांबळेला व्यासपीठावरून खाली बोलावून घेऊन त्यांच्यासह रवी मोरे, सुरेश चव्हाण अशी अनेक मंडळी गावातल्या चौकात येताच तालमीत लपून बसलेले प्रभाकर कावळे, गुणवंत पाटील, जगन्नाथ पंडित इ. लोक धावत बाहेर येताच हातातल्या शस्त्रानिशी हल्ला करतात. तोच तात्या कांबळे जागच्या जागी धरणीवर कोसळतो. वाघासारख्या माणसाला हल्लेखोरांनी ठार करुन 'जलसाकार' तात्या कांबळेच गाव ही ओळख कायमची पुसून टाकली होती. नाव असलेल्या आणि म्होरक्या असलेल्या दलिताचा खून करुन सर्वसामान्य दलितांना धडा शिकवण्याचा सवर्णांनी केलेला हा प्रयत्न होता.

*** प्रभाकर कावळे :**

प्रभाकर कावळे हा अचलपूर गावचे गावकामगार पोलीसपाटील रामभाऊ कावळे यांचा मोठा मुलगा व सोनालीचा पती असून मधुकर कावळेचा लहान भाऊ आहे. राखीव जागेमुळे तात्या कांबळे गावचा सरपंच होईल व आपल्या वडिलांना या पदाला मुकावे लागेल, याचा राग प्रभाकरच्या मनात होता. गावातील इतर सवर्ण लोकांचाही तात्या कांबळेवर अनेक कारणांनी राग होता. प्रभाकर इतर सवर्ण लोकांच्या मदतीने तात्या कांबळेचा खून करतो. खूनात सहभागी असल्याने पोलीस त्याला अटक करतात. पण पैशाच्या जोरावर त्याचा भाऊ मधुकर कावळे त्याला व त्याच्या इतर साथीदारांना तुरुंगातून निर्दोष सोडवून आणतो. कावळेच्या वाड्यावर सगळीकडे आनंदी आनंद असतो. सर्वजण स्वागताच्या तयारीत असतात. तुरुंगातून निर्दोष सुटलेले लोक मिरवणुकीने वाड्यावर नाचत येत असतात. मिरवणूक वाड्याजवळ येताच सोनाली प्रभाकरला ओवाळण्यासाठी पुढे

होते, तोच कबीर कांबळे प्रभाकरवर गोळ्या झाडून तात्या कांबळेच्या खूनाचा बदला घेतो क्षणार्धात प्रभाकर जमिनीवर कोसळतो आणि दलित सवर्ण संघर्षात आपला प्राण गमावतो.

*** माणिकचंद व गोपीचंद :**

माणिकचंद व गोपीचंद हे दोघे जुळे भाऊ बंकटशेटचे जावई असतात. मुळातच महाकंजुष असणारे सासऱ्याच्या जीवावर रुबाब करणारे म्हणून ओळखले जात. दोघांचं हसणे, वागणे, बोलणे सारखेच होते पण फरक होता तो दोघांच्या उंचीत. गोपीचंदपेक्षा माणिकचंद दोन इंच लहान होता. दोघेही नेहमी भरल्या बाजारासारखे दिसायचे. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी कसलातरी लिलाव चालल्याचा भास होत असल्यामुळे त्यांचे ओठ नेहमी बोली बोलत असल्यासारखे वाटत असे. समोरच्या व्यक्तिला ते नोकर समजूनच वागवत असत. प्रभाकरने खून करताना आपण पाहिल्याचे व त्याविरुद्ध त्यांचा वॉचमन सदानंद कांबळे याच्या जबाबावर प्रभाकरला तुरुंगात पाठवणार असल्याचे सांगून त्याबदल्यात प्रभाकरला निर्दोष सोडविण्यासाठी मधुकर कावळेकडून लाखो रुपयांची लुटालूट करतात.

*** सदानंद कांबळे :**

सदानंद कांबळे हा 'जलसाकार' तात्या कांबळेचा लहान भाऊ. गोपीचंद व माणिकचंद यांच्या फार्महाऊसवर वॉचमन म्हणून नोकरी करत असल्याने त्याचे कुटुंब तेथेच स्थायिक असते. गावापासून लांब फार्महाऊसवर राहिल्याने त्याचा गावाशी फारसा संबंध नव्हताच. फार्महाऊसवर नोकर म्हणून तो लाचारीचं जीवन जगतो. स्वत:च्या भावाच्या खूनाबद्दल त्याची कसलीही तक्रार नसते. उलट माणिकचंद व गोपीचंदच्या हातातील बाहुल्याप्रमाणे तो दोघे सांगतील तसे ऐकत असतो. गावाच्या राजकारणात उतरण्यासाठी व स्वत:ची तुंबडी भरुन घेण्यासाठी आपला वापर करून घेतात, याची पुसटशी कल्पना त्याच्या मनाला स्पर्शून जात नाही. यावरुन तो लाचारीचं मूर्तीमंत प्रतीकच वाटतो. माणिकचंद व गोपीचंद यांनी सदानंद कांबळेला ग्रामपंचायतीच्या राखीव जागेसाठी निवडणूकीला उभा केले. त्याच्या विरोधात लहू मांग निवडणूक लढवत असल्याने रामभाऊ कावळेचा त्याला

पाठिंबा होता. तात्या कांबळेच्या हत्येनंतर गावातले राजकीय समीकरण बदलल्याने दलित विरोधी सवर्ण ही भावना उग्र बनली होती. धर्मनिरपेक्षता धुळीला मिळाल्याने लोकांमध्ये जातीय भावना उफाळून येत होत्या.

सरपंच पदाला आरक्षण लागल्याने सदानंद कांबळे सरपंच होतो. प्रथमच दलित व्यक्तिला गावचे सरपंचपद मिळणार असल्याने गावही बिथरला जातो, माणिकचंद व गोपीचंदला एक नवा आत्मविश्वास आलेला असतो. राजकारणात त्यांना चंचुप्रवेश मिळाल्याने त्यांना आनंद वाटत होता. परंतु दलितांना अधिकाराच्या जागेवर स्वीकारण्याची सवय सवर्णांना अजून झाली नव्हती. सवर्ण लोक सदानंद कांबळेचा  नेहमी द्वेष करत होते. आपल्या स्वार्थासाठी व आमदारकीच्या निवडणूकीसाठी तो मारेकऱ्यांच्या बाजूने साक्ष देतो. सदानंद कांबळे मंत्री झाल्यामुळे गावात अनेक सुधारणा झाल्या होत्या. स्वत:च्या स्वार्थासाठी विकला गेलेला, भावाचा खून पचविलेला, हरघडी तडजोडी करणारा सदानंद कांबळे म्हणजे दलितांच्या वेड्याविद्र्या इतिहासाची साक्षच दिसून येते.

*** रोहित :**

रोहित हा तात्या कांबळेचा एकुलता एक मुलगा वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून तोही जलशामध्ये भूमिका करून दलित समाज बांधवांना जागृत करण्याचे काम करत होता. शहरात कॉलेजला असताना कॉलेज कार्यक्रमात त्याने भाग घेऊन सोनालीबरोबर डान्स केला होता. कॉलेज संपल्यानंतर सोनालीचे लग्न त्याच गावातील प्रभाकर कावळेशी होते, पण प्रभाकरने त्याच्या वडिलांचा खून केल्यामुळे जाब विचारण्यासाठी रोहित त्याच्या घरी जातो तेव्हा सोनालीला समोर पाहून तो जागच्या जागी थांबतो. तिच्या सांगण्यानुसार तो परत जातो, येथे रोहितचा सहनशील स्वभाव दिसून येतो.

तात्या कांबळेच्या मृत्यूने गावावर बराच परिणाम झाला होता, यातून दलित सवर्ण संघर्ष वाढल्याने सवर्णांनी दलितांच्या झोपड्या जाळल्या. रोहित मात्र वडिलांच्या हत्येमुळे खचला होता. पण अशा परिस्थितीतही तो आपली आई सवितालाही आधार देण्याचा

प्रयत्न करतो. वडिलांच्या खूनाबाबत कोर्टात केस चालू होते, त्यावेळी त्याचा काका सदानंद कांबळे स्वार्थासाठी आपली साक्ष फिरवतो. सरपंच झाला पण मंत्री होण्याचे स्वप्न असल्याने तो स्वत:च्या भावाच्या खून्याच्या बाजूने साक्ष देतो. रोहितची साक्ष प्रभावी ठरली होती. कोर्टासमोर मला आणखी काही सांगायचं आहे, याबाबत आपल मनोगत व्यक्त करताना तो म्हणतो की 'सदानंद कांबळे माझे काका आहेत. त्यांनी सवर्णांची सहानुभूती आणि मते मिळवण्यासाठी आपली साक्ष उलटविली आहे. राजकीय स्वार्थासाठी त्यांनी सत्याकडे पाठ फिरवली आहे. ही वस्तूस्थिती आहे. माझी आई माझ्या वडिलांच्या निर्घृण खूनामुळे विचलित झाली आहे. तिने हिंस्त्र आणि भ्याड प्रवृत्तीचा धसका घेतला आहे. सदानंद कांबळे आणि सविता कांबळे ह्यांच्या साक्षींचे सत्यशोधन करताना ह्या परिस्थितीचाही विचार करावा अशी मी कोर्टाला विनंती करतो.'[५] रोहित पूर्ण आत्मविश्वासाने बोलत होता. पण रोहितच्या काकांच्या साक्षीवर मारेकरी निर्दोष सुटतात. वाद्यासह मिरवणुकीने सर्वजण वाड्यावर पोहचतात. वाड्यातील सर्व मंडळी स्वागतासाठी उभारलेली असतात. सोनाली प्रभाकरला ओवाळताना कबीर कांबळे प्रभाकरवर गोळी झाडून तात्या कांबळेच्या खूनाचा बदला घेतो. क्षणार्थात प्रभाकर जमिनीवर कोसळतो. मधुकर कावळे प्रभाकरचा जखमी देह गाडीत घालून शासकीय रुग्णालयात नेतो पण तेथे अगोदरच कोर्टाचा निकाल ऐकून काशिनाथ पोळकेने स्वत:ला पेटवून घेतल्याने रोहितसह त्याची आई व इतर अनेक दलित कार्यकर्ते उपस्थित असतात. दलित कार्यकर्ते गटतट विसरुन मधुकर कावळेला मदत करत होती. मात्र सोनाली रोहितच्या गळ्यात पडून रडत होती. रोहितने तिला आधार दिला होता कारण रोहित आणि सोनाली एकमेकावर जीवापाड प्रेम करत असतात.

*** सोनाली :**

सोनाली ही बळीराम पाटलांची मुलगी. शहरात महाविद्यालयात शिकत असताना तिने स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात केलेले नृत्य वन्समोअर झाल्याने सोनाली अनेक नजरांचा

विषय बनल्याने ती 'कॉलेजक्वीन' झाली होती. स्थानिक वर्तमानपत्राच्या 'कॉलेजविश्व' ह्या सदरात तिचा फोटो आणि मुलाखत छापून आली होती. तिच्याबरोबर रोहितचाही फोटो छापून आला होता. रोहित दलित विद्यार्थी असल्याने सोनालीबरोबर छापून आलेल्या फोटोने व सोनालीने आपल्या मुलाखतीमध्ये रोहितचे कौतुक केल्याने सवर्ण विद्यार्थी चिडले होते. "तिने दलित मुलाबरोबर नाचून आमचा अपमान केलाय. या कारणाने चिडून रोहित व सोनालीच्या नृत्यामधील विविध पोजचे फोटो तिच्या घरी पाठवले. त्यामुळे सोनालीचे वडील बळीराम पाटील बचैन झाले होते."[६] एका दलित मुलाने आपल्या मुलीला नाचवले ह्या भावनेन ते विचलित झाले होते. सोनाली आणि रोहितचा असा कोणताच पूर्वपरिचय नव्हताच, ते केवळ कार्यक्रमानिमित्त एकत्र आल्याने दोघे मनमोकळे बोलत असत.

रोहित दलित आहे ही कल्पनासुद्धा तिच्या मनाला शिवली नव्हती. उलट त्यांचे नृत्य 'वन्समोअर' झाल्याने ती रोहितच्या नृत्यावर खुष होती. सोनालीला कथा, कादंबऱ्या वाचनाची व कविता करायची आवड होतीच. शिवाय ती भरतनाट्यम शिकल्याने लोकनृत्यही तिला आवडत असे. तिच्या कविता स्थानिक वर्तमानपत्राच्या रविवार पुरवण्यातून छापून यायच्या. तिच्या कवितामध्ये मीलनाविषयी प्रचंड उत्सुकता असल्याने तिच्या कवितेचा नायक केवळ पुरुष असायचा. तिच्या कविता म्हणजे भावूक मनाच्या असंख्य सावल्याच असल्याचा भास व्हायचा. एके दिवशी सोनालीच्या कवितांची डायरी तिच्या वडीलांच्या हाती लागली आणि कविता वाचून त्यांचा गैरसमज झाला. त्यांनी सोनालीचं शिक्षण बंद केल्याने तुटलेल्या पतंगासारखी तिची अवस्था झाली. प्रचंड मानसिक तणाव सहन करत ती जगू लागली.

मधुकर कावळे आणि सोनालीचे वडिल उद्योगधंद्यात भागीदार असल्याने मधुकर पुढाकार घेऊन सोनालीचे लग्न आपला भाऊ प्रभाकरशी लावून देतो. लग्न झाल्यानंतर सोनाली शहरातून खेड्यात आली आणि प्रभाकर कावळेबरोबर तिने आपले नवीन वैवाहिक जीवन सुरु केले. नवविवाहित जोडप्याचे सुरुवातीचे दिवस आनंदात जातात, पण प्रभाकरचा

स्वभाव तापट असल्याने तात्या कांबळे गावचा पाटील होईल आणि आपल्या वडिलांना सरपंचपद गमवावे लागेल या कारणाने प्रभाकरही इतर साथीदारांच्या बरोबर खून करण्यात सामील होतो. तात्या कांबळेचा खून झाल्याने पोलिस त्याला पकडून नेतात आणि नवीन सुरु झालेला संसार मोडतो. आपल्या वडिलांच्या खूनाचा जाब विचारण्यासाठी रोहित कावळेच्या वाड्यावर येतो तेव्हा सोनालीला समोर पाहून त्याच्या हातातील कुऱ्हाड खाली येते सोनालीच्या सांगण्यावरुन रोहित परत जातो. रोहित पुन्हा भेटल्याने त्याच्या आठवणीने ती वेडीपिशी होते. प्रभाकरऐवजी तिला रोहितचाच चेहरा आठवतो. प्रभाकर तुरुंगातून सुटून आल्यानंतर कबीर कांबळे प्रभाकरचा खून करून तात्या कांबळेच्या खूनाचा बदला घेतो. प्रभाकर कावळेच प्रेत शासकीय रुग्णालयात नेले जाते. तेथे रोहित काशिनाथ पोळकेबरोबर दवाखान्यात गेलेला असताना सोनालीही गाडीतून आलेली असते तेव्हा रोहितच सोनालीला आधार देतो.

*** गौण व्यक्तिरेखा :**

'हिंदू' या कादंबरीमध्ये प्रमुख व्यक्तिरेखांबरोबर काही गौण व्यक्तिरेखाही या कादंबरीत लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी साचेबंद केल्यामुळे कादंबरीला उठावदारपणा आला आहे. कसबे गुरुजी, रामभाऊ कावळे, सविता कांबळे, सुरेखा माने, दिपक माने, जगन्नाथ पंडित द्रौपदी, मधुकर कावळे, रंजना मोरे, मंगेश कांबळे इ. गौण व्यक्तिरेखांचा सविस्तरपणे अभ्यास करणार आहोत.

*** कसबे गुरुजी :**

कसबे गुरुजी हे अचलपूर गावातील शाळेत शिक्षक होते. ते दलित शिक्षक असल्याने त्या गावातील सवर्ण समाज त्यांना कमी लेखत असे. सवर्णांना दलितांचा अतिशय तिरस्कार असल्याने एके दिवशी शाळा भरली असताना कसबे गुरुजी वर्गात 'बाबासाहेब आंबेडकरांचा पाठ शिकवत होते. मधली सुट्टी झाल्यानंतर गावात बातमी पसरते की, 'कसबे गुरुजींनी वर्गात आंबेडकर शिकवला'[७] या गोष्टीवर चिडून सर्व गाव

एकत्र आल्याने लोकांचा गोंधळ ऐकून शाळेतील मुलं बावरतात. बाजीराव चव्हाण व सदाशिव मोरे वर्गात आले आणि त्यांनी वर्गात कसबे गुरुजींना धमकवायला सुरुवात केली. 'काय हो गुरुजी, तुम्ही आमच्या मुलांना आंबेडकर शिकविला की नाही.'[८] असे म्हणून त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांचा पाठ असलेली पाने मुलांना फाडायला सांगितली. या गोष्टीने कसबे गुरुजी नाराज झाले व त्यांनी बदलीसाठी अर्ज केला. हा गाव जातीयवादी असल्याने याठिकाणी आपल्याला असुरक्षित वाटते. या कारणामुळे आपली अन्यत्र कोठेही बदली करावी. पण हा माणूस शिकला सवरलेला असल्याने व सर्व कायदे माहित असल्याने अचलपूरमध्ये सवर्ण लोक त्यांना घाबरत होते.

*** रामभाऊ कावळे :**

रामभाऊ कावळे अचलपूर गावचा गावकामगार पोलीस पाटील अशी ख्याती होती. ते गावचा पाटील असल्यामुळे त्याच्या मनात नेहमी दलितांविषयी तिरस्कार होता. राखीव जागेमुळे तात्या कांबळे गावचा पाटील झाल्याने तात्या कांबळेवर रामभाऊ कावळे चिडून असायचा. याचा परिणाम त्याचा मुलगा मधुकर कावळे याच्यावर झाल्याने तो तात्या कांबळेच्या खूनाचा बेत इतर लोकांच्याद्वारे आखतो. रामभाऊ कावळेचा मुलगा प्रभाकर तात्या कांबळेचा खून करून पळून जातो. पण रामभाऊ कावळे हा मग्रूर पाटील असल्याने तो दलितांना नेहमीच अमानूष वागणूक देत असतो.

*** सुरेखा माने :**

सुरेखा माने ही दिपक मानेची बायको तिचा नवरा दिपक तुरुंगात गेल्याने तिने घर सांभाळले होते. ती धंद्यात मुरलेली बाई असल्याने तिची वृत्ती निर्भिड होती. त्यामुळे तिला पुरुषजातीची भिती वाटत नव्हती. नवरा जेलमध्ये असल्याने तिच्यावर कोणाचाही वचक नव्हता याचा फायदा घेऊन ती दलित तरूण मंगेश कांबळेबरोबर मुंबईला पळून जाते.

*** जगन्नाथ पंडित :**

जगन्नाथ पंडित हा सदाशिव मोरे याचा जीवाभावाचा मित्र होता. सदाशिव मोरेची बहीण रंजना हिच्याबरोबर जगन्नाथ पंडितचे लग्न ठरते. पण नोकरीच्या ठिकाणी हेमा नावाच्या मुलीशी त्याचे सुत जुळते व तो तिच्याशी लग्न करतो. याचा राग मनात धरुन सदाशिव मोरे जगन्नाथ पंडित बोगस कागदपत्रे तयार करुन नोकरीस लागला आहे ही बातमी तात्या कांबळेला जाऊन सांगतो. तात्या कांबळेनं हे प्रकरण धसास लावल्याने त्याची नोकरी जाते. या कारणाने चिडून जगन्नाथ पंडित तात्या कांबळेच्या खूनात सहभागी झाल्याने त्याला अटक होते. पण तुरुंगातच तो आत्महत्या करतो.

*** सविता कांबळे :**

सविता कांबळे ही जलसाकार तात्या कांबळेची पत्नी व रोहितची आई तीही आपल्या पतीबरोबर समाजकार्यात भाग घेत होती. रोहितच्या भवितव्यासाठी ती झटत होती. त्यासाठी तिने स्वत:हून रोहितला शहरात शिकायला पाठविले होते. सविता कांबळे आपल्या पतीचा खून झाल्यामुळे खचली होती. रोहितचा व तिचा आधारच नष्ट झाल्यामुळे रोहितच्या भवितव्याची चिंता तिला वाटत होती. त्यामुळे दारात कोणाचा जरी पाऊल वाजला तरी ती दचकायची. एवढी भिती पतीच्या हत्येनंतर तिच्या मनात निर्माण झाल्याने सविताचे मानसिक संतुलन बिघडले होते. आपल्या पतीचा झालेला खून सविता कांबळेनं पचवला होता. पण कोर्टात त्याचा पुन्हा एकदा होणारा खून पचवणे तिला अवघड झाले होते. ज्याला लहानपणापासून पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळलेला धाकटा दीर सदाशिव स्वत:च्या स्वार्थासाठी स्वत:ची साक्ष उलटतो. जवळच्याच व्यक्ति आपल्याला दगा देताना पाहून ती विचलित होते.

*** दिपक माने :**

दिपक माने हा अचलपूर गावातील सवर्ण तरुण होता. त्याचे लग्न सुरेखाशी होते. लग्नाला जेमतेम एक वर्षे होत न होते तोपर्यंत तो तात्या कांबळेच्या खूनात मधुकर

कावळेच्या सांगण्यावरून सामील होतो. या खूनप्रकरणात त्याला अटक झाल्याने गजाआड व्हावे लागते. घरात तो एकटाच कमावता होता. गावात त्याचा पानपट्टीचा खोका होता. तोही दिपकला अटक झाल्याने बंद पडला होता. त्याची बायको सुरेखा जेव्हा त्याला तुरुंगात भेटायला जाते तेव्हा तो ढसाढसा रडतो. त्याच्या तुरुंगात जाण्याने सुरेखाचे बेताल वागणे सुरु होते व ती दलित तरुण मंगेश कांबळे याच्याबरोबर मुंबईला पळून गेल्याचे समजताच दिपक माने तुरुंगातच आत्महत्या करतो.

*** द्रौपदी :**

द्रौपदी ही लहू मांगाची बायको. द्रौपदी दलित समाजातील शिवाय घरची परिस्थिती गरिबीची असल्याने गावकी करूनच आपला उदरनिर्वाह तिला करावे लागे. सकाळी लवकर उठून सर्व गाव झाडून झाल्यावर गावात शिळ्या भाकरी मागून आणून खाणे हाच त्यांच्या जीवनाचा दिनक्रम होता. तिचा नवरा लहू मांग हा रात्री गावात गस्त घालत फिरत असे. द्रौपदी गाव झाडत असताना गावातील मंदिरासमोरील आंगणही झाडत असे. याच्या बदल्यात विष्णु पुजारी तिला प्रसाद देत. एके दिवशी प्रसाद देण्याच्या बहाण्याने तिला मंदिरात बोलावून घेतो आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो. पण द्रौपदी त्याच्या हाताचा चावा घेऊन आपली सुटका करून घेते. दलित स्त्री कोणत्याही अमिषाला बळी न पडता आपले शील जपते. द्रौपदी आपल्याविषयी गावात काहीतरी सांगेल या भीतीने विष्णु पुजारी घाबरलेला असतो. द्रौपदीला अद्दल घडविण्यासाठी तिच्यावर भानामती चेटूक केल्याचा आरोप करतो. तिच्याविरुद्ध सर्व गावाला भडकवतो. सवर्ण लोक तिची गावातून नग्न धिंड काढतात. महाभारतात द्रौपदी विवस्त्र झाली नव्हती, पण स्वतंत्र भारतात मात्र ती विवस्त्र झाली होती कारण ती दलित होती. तिच्या मदतीला भीमनगरमधील माणसे धावून आली. पण गाव मात्र आंधळ्या धृतराष्ट्रासारखा पाहत उभा होता.

*** मधुकर कावळे :**

अचलपूर गावचे सरपंच रामभाऊ कावळे यांचा मोठा मुलगा मधुकर कावळे. मधुकरने पुण्याला भागीदारीत व्यवसाय चालू केला होता. अधूनमधून तो अचलपूरला येत असे. पिढ्यान पिढ्या असलेले सरपंच पद राखीव जागेमुळे दलिताकडे जाणार व गावातील जलसाकार तात्या कांबळे सरपंच होणार या कारणाने मधुकर कावळे चिडला होता. तात्या कांबळेच्या जलशामुळे गावातील सवर्ण लोक चिडले होते. 'जलसाकार तात्या कांबळेचं गावं' म्हणून अचलपूरची नवी ओळख निर्माण झाली होती. एका दलिताच्या नावाने गावची ओळख व्हावी हे सवर्णांना पटत नव्हते. तात्या कांबळेविरुद्ध मधुकर कावळे गावातील सर्व सवर्णांना एकत्र करून त्याच्या खूनाचा कट रचतो. आपला भाऊ प्रभाकर याला खून करण्याची सर्व माहिती देऊन आपण आपण पुण्याला निघून जातो व ठरलेल्या वेळेमध्ये प्रभाकर गावातील लोकांच्या सहकार्याने तात्या कांबळेचा खून करतो. पण खूनाचा मुख्य सूत्रधार मधुकर कावळे राजरोसपणे फिरत असतो. दलितांच्या बद्दल नेहमी तिरस्काराची भावना ठेवणारा मधुकर कावळे म्हणजेच सूडतेचे मूर्तीमंत उदाहरणच म्हणावे लागेल.

*** रंजना मोरे :**

रंजना मोरे सदाशिव मोरेची बहीण. रंजनाच लग्न सदाशिव मोरेचा मित्र जगन्नाथ पंडित बरोबर ठरलेलं असते. जगन्नाथ पंडितला नोकरी लागते आणि तो आपल्याबरोबर काम करणारी मुलगी हेमा हिच्याशी लग्न करतो. त्यामुळे रंजनाबरोबर ठरलेलं लग्न मोडते. रंजना मोडून पडते तिला मागण येत नसल्याने तिचं लग्न जमत नव्हते या कारणाने तिला वेडाचे झटके येतात. वेडाच्या भरात ती आपल्या अंगावर बिब्बे घालून अंथरूणावर टाचण्या पसरून त्यावर ती झोपत असे. गावभर तिच्यावर चेटूक होत आहे म्हणून चर्चा होत होती. आपले लग्न मोडल्याच्या अपमानाने ती पूर्णपणे खचून जाते.

*** मंगेश कांबळे :**

मंगेश कांबळे हा दलित तरुण तात्या कांबळेच्या जलशात तो ढोलकी वाजवण्याच व सूत्रधाराचे काम करत असायचा. जलशात काम करून आपल्या दलित बांधवांना स्वत:वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाण करून देत असे. तात्या कांबळेच्या हत्येनंतर जलसा बंद पडल्याने मंगेश कांबळे नोकरीसाठी मुंबईला जातो. मुंबईत राहिल्यामुळे त्याच्या वागण्या बोलण्यात स्वभावात बेदरकारपणा आला होता. तारुण्यानं मुसमुसलेला मंगेश रुबाबदार वाटायचा. त्याच्या रुबाबादार वागण्यावरच सुरेखा माने फिदा झाल्यामुळे त्याच्याबरोबर मुंबईला पळून जाते.

*** 'हिंदू' कादंबरीतील संघर्ष :**

संघर्ष हा साहित्याचा महत्वाचा घटक असल्याने संघर्षाशिवाय कलाकृती निर्माण होत नाही. जीवनात अनेक चढउतार आल्याने कित्येक संघर्षमय प्रसंगाना सामोरे जावे लागते. संघर्षाविषयी प्रा. ना.सी. फडके म्हणतात 'समरप्रसंग हाच कादंबरीचा आत्मा आहे.'[९] संघर्ष हा मानवी जीवनातील अपरिहार्य घटक असल्याने तो कधीकधी व्यक्तिगत असतो. तर कधी सामाजिक पातळीवरील दोन जातीमधला संघर्ष असतो. याचे स्वरुप वैयक्तिक किंवा सामूहिक असते. शिवाय संघर्षामुळेच मनुष्याचे असे धैर्य आणि त्याच्यातील सतशील आणि सतप्रवृत्तीचे गुण दृष्टीस पडतात. ज्याप्रमाणे कथानकाशिवाय कादंबरी पूर्ण होऊ शकत नाही त्याप्रमाणे संघर्षाशिवाय कादंबरी रंजक व वाचनीय होत नाही.

संघर्ष हा 'हिंदू' कादंबरीचा महत्वाचा घटक आहे. हिंदू धर्मावरील जातीयतेचा कलंक किती काळाकुट्ट आहे याची प्रचिती सवर्ण व दलितांमधील संघर्षातून दिसून येते. तात्या कांबळे हा अचलपूरमधील दलित पुढारी व जलसाकार असल्याने 'जलसाकार तात्या कांबळेच गाव' म्हणून अचलपूरची ओळख वाढत होती. तात्या कांबळेने आंबेडकरी जलशाद्वारे आपल्या दलित बांधवांना जागृत करण्याचे काम हाती घेतले. अधूनमधून जलशाच्या रंगीत तालमी व्हायच्या. यामुळे शिवभजन ऐकायला येणारी मंडळी जलसा

पहायला जात असल्यामुळे विष्णू पुजारी काळजीत पडले होते. लोकांच्या अंधश्रद्धांना तडे जात असल्याने शिवभजन सुने सुने वाटत होते. गावातील बरीच मंडळी कोणत्या ना कोणत्या कारणाने चिडलेली असल्याने 'तात्या कांबळेचा जलशा बंद पडला पाहिजे.'[१०] यावर सर्वांचे एकमत झाल्याने प्रत्येकजण आपली मतं हिरीरीने मांडतात.

राखीव जागेमुळे तात्या कांबळे गावचा पाटील होईल म्हणून मधुकर कावळे चिडला होता. नोकरी घालवली म्हणून जगन्नाथ पंडित सूडाने पेटला होता. सरपंचपद हुकलं म्हणून गुणवंत पाटील चिडला होता. सर्वांच्याच मनात असंतोष निर्माण झाल्याने तात्या कांबळेच्या खूनाचा कट शिजतो. किड्यामुंग्यासारखे क्षुद्र जीवन जगणारी माणसं पेटून उठत होती यामुळे सवर्णांचा अहंकार दुखावला होता. दलितांच्या स्वाभिमानाने सवर्णामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. त्यांनी आपली सेवा चाकरी करावी व आम्ही देईल ते घेऊन धन्य मानावे अशी सवर्णांची भूमिका होती, पण दलितांनी ह्या व्यवस्थेला नाकारले होते. या सर्व कारणांचा मार्गदर्शक तात्या कांबळे असावा असा राग मनात धरून धम्मचक्रपरिवर्तनाच्या कार्यक्रमादिवशी तात्या कांबळेचे भाषण संपल्यानंतर सुरेश चव्हाणने तात्या कांबळेला चिठ्ठी पाठवून व्यासपीठावरून खाली उतरले तात्या कांबळे रवी मोरे, शंकर पुजारी, गावातल्या चौकात आल्याबरोबर तालमीत लपून बसलेले प्रभाकर कावळे, दिपक माने, सतिश कुलकर्णी हातातल्या शस्त्रानिशी धावत बाहेर येतात आणि तात्या कांबळेवर तुटून पडतात. तात्या कांबळेला ठार करुन 'जलसाकार तात्या कांबळेच गाव' ही ओळख कायमची पुसून टाकतात. नाव असलेल्या आणि म्होरक्या असलेल्या दलिताचा खून करन सर्वसामान्यांना धडा शिकवण्याचा हा प्रयत्न होता. या घटनेतून सामाजिक दहशतवादाचे विकृत रुप दिसून येते. अशा प्रसंगातून दलित सवर्ण संघर्षाची ठिणगी पेटते आणि एखादा तात्या कांबळेसारखा दलितांचा नेता सवर्णांच्या हल्यात मारला जातो.

*** छोट्या – छोट्या वाक्यांचा वापर :**

'हिंदू' कादंबरीचा आशय हा सरळ साध्या सोप्या भाषेतून व वाक्यातून लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी मांडून कादंबरीच्या आशयाला समृद्ध केले आहे.

उदा : गोपीचंदने हॉर्न वाजविला. सदानंद कांबळे धावत आला. गेट उघडले. कार थांबली. मी उतरलो. माणिकचंद खाली उतरला. सकाळ झाली होती. लक्ष्मी घरकामात गुंतली होती. प्रज्ञा शाळेत गेली होती. मी वर्तमानपत्र चाळत होतो. पोलिस फुकट पगार घेतात. गुन्हेगारांना पकडत नाहीत. लोक चेकाळले होते. पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली होती. पोलिसांनी अश्रुधूर सोडला होता, सौम्य लाठीहल्ला केला होता, लोकांची धरपकड केली होती, काशीबाईन सोनालीला जवळ घेतल, सोनालीचा चेहरा पांढरा पडला होता. सोनालीला रडू येत नव्हतं, काशिबाईची विचित्र अवस्था झाली होती, रामभाऊ कावळे काहीच बोलत नव्हते. यासारख्या छोट्या – छोट्या वाक्यांनी कादंबरीचे कथानक समृद्ध होताना दिसते.

*** रुपक, प्रतिकांचा वापर :**

आशयाचे एक अविभाज्य अंग म्हणून लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी 'हिंदू' या कादंबरीत रुपक, प्रतिक, प्रतिमांचा वापर करुन कादंबरीला ठाशीवपणा आणलेला आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखक म्हणतो की माझे हात बोधीवृक्षाच्या फांद्यागत झुलत होते. नैसर्गिक वातावरणाचे वर्णन करताना सूर्याचा लालबूंद गोळा डोंगराआड होत होता. क्षितीजाने जणू कुंकू लावले होते. चांदण्यांनी आभाळ गजबजले होते. चंद्र ढगाढगातून धावत होता. रातकिड्यांनी अंधाराची आळवणी सुरु केली होती. काजवा मृतात्म्यासारखा इकडून तिकडे भटकत होता. साऱ्या शिवारावर चंदेरी मुलामा पसरला होता. रातकिडे जणू शोकगीत गात होते. शिवारातील पिक खाली मान घालून डोलत होती. यासारख्या रुपकांची सहज केलेली योजना या कादंबरीत दिसून येते. रुपकांचा वापर आशयानुरुप प्रकट झाल्याने कादंबरीला समृद्धता प्राप्त झाली आहे.

महारवाड्याला आग लागली वाटतं. वाड्यातलं वातावरण दूध नासाव तस नासलं होतं. गावकुसाबाहेर पाणी पेटलं होतं काळोख दलदलीसारखा वाटत होता. इ. अनेक प्रतिकांचा वापर झाल्याने कादंबरीच्या आशयाचे सामर्थ्य वाढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात 'हिंदू' कादंबरीचा अभिव्यक्ती विशेषांचा विचार केला. कथानकामध्ये अचलपूर या खेडेगावातील दलित विरुद्ध सवर्ण यांच्यातील संघर्ष आणि या संघर्षातून अनेकांचे उघडे पडलेले संसार याचे विदारक चित्रण दिसून येते. व्यक्तिचित्रण, संघर्षचित्रण, छोट्या – छोट्या वाक्यांचा वापर करुन कादंबरीकाराने कथानक सोपे करुन मांडण्याचा प्रयत्न केला आहे तर रुपक प्रतिमांचा वापर करुन कादंबरीला ठाशीवपणा आणलेला आहे. कादंबरीचे कथानक कधी निवेदकामार्फत पुढे सरकते तर कधी कादंबरीतील घटना प्रसंगानुसार घडताना दिसते यावरुन कादंबरीच्या आशयात एकसंधपणा जाणवत नाही. 'हिंदू' या कादंबरीतून लेखकाने एकीकडे उग्र हिंदुत्वाची लाट आणि दुसरीकडे त्याविरुद्ध संघटित होणारी दलितांमधील आत्मसन्मानाची जाणीव यातील संघर्ष चित्रीत केलेला आहे. जातीयतेचा कलंक किती काळाकुट्ट आहे याची प्रचिती आणून देणारी ही कादंबरी असल्याने दलित कादंबरीत आपले महत्व प्राप्त करुन देते. या कादंबरीत तात्या कांबळे, प्रभाकर कावळे, माणिकचंद व गोपीचंद, सदानंद कांबळे, रोहित, सोनाली या प्रमुख व्यक्तिरेखेबरोबरच कसबे गुरुजी, रामभाऊ कावळे, सविता कांबळे, सुरेखा माने, जगन्नाथ पंडित, दिपक माने या गौण व्यक्तिरेखा कादंबरीत आहेत.

**निष्कर्ष :**

१) 'हिंदू' ही दलित कादंबरी असून या कादंबरीला सामाजिक व राजकीय आशय लाभल्याने दलित – सवर्ण संघर्षावर प्रभाव टाकते.

२) उपेक्षित जीवन जगणारी माणसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होऊन स्वाभिमानाने जीवन जगत असताना दलितांविषयी सवर्णांच्या मनात असंतोष निर्माण होतो याचा पट या कादंबरीत चित्रित होतो.

३) 'संघर्ष' हा 'हिंदू' कादंबरीतील महत्वाचा घटक असल्याने हिंदू धर्मावरील जातीयतेचा कलंक काळाकुट्ट आहे याची प्रचिती सवर्ण व दलितांमधील संघर्षातून दिसून येते.

४) दलित चळवळीत फूट पडल्याने वाढलेल्या चंगळवादातून लोकांच्या प्रश्नांकडे स्वत:ची तुंबडी भरुन घेण्याच साधन म्हणून पाहणाऱ्या माणिकचंद व गोपीचंद यासारख्या प्रवृत्तीद्वारे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे.

५) कादंबरीतील निवेदन कधी निवेदकामार्फत सांगितले जाते तर कधी पात्रामार्फत व्यक्त झाल्याने कथानकात एकसंधपणा जाणवत नाही.

६) आंबेडकरी तत्वज्ञानाचा पुरस्कार व स्विकार करणे, जातीव्यवस्थेला नाकारणे या बाबींचे सूचन 'हिंदू' कादंबरीतून चित्रित होते.

७) दलितांवर होणारा अन्याय अत्याचार आणि हिंदू समाजातील विकृत जातीव्यवस्थेच्या ओझ्याखाली दडपून गेलेल्या दलित समाजाचे वास्तव चित्रण या कादंबरीत केले आहे.

८) सामाजिक दृष्ट्या ही कादंबरी महत्वाची असून दलित सवर्ण यांच्यातील संघर्ष, दलितांची जगण्याची धडपड, विषमता, जातीयता यामुळे होणारी दलितांची अवहेलना याचा पट उलगडण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे.

## संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| १) | शरणकुमार लिंबाळे | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १५ नोव्हे. २००३, पृ. २०. |
| २) | तत्रैव | पृ. ६३ |
| ३) | तत्रैव | पृ. २५ |
| ४) | तत्रैव | पृ. ५२ |
| ५) | तत्रैव | पृ. १४१ |
| ६) | तत्रैव | पृ. ४९ |
| ७) | तत्रैव | पृ. ४५ |
| ८) | तत्रैव | पृ. ४५ |
| ९) | सुशिला ढगे | मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल सुगावा प्रकाशन पुणे, प्रथामावृत्ती जून, २००४, पृ. ७९ |